ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2017

REVIEW OF RESEARCH

# सातत्यपूर्ण,सर्वकंष मूल्यमापन प्रक्रिया राबवितांना प्राथमिक शिक्षकांना येणा-या समस्यांचा अभ्यास

**डॉ. दत्ता वाघमारे**
**सहायक प्राध्यापक , कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर.**

## प्रास्ताविक



मुलाच्या सर्व बाजूंनी विकास होण्यामध्ये सध्याचे मूल्यमापन यशस्वी ठरत नाही याचे कारण म्हणजे मूल्यमापन केव्हा करायचे, किती वेळा करायचे या विषयी अनेकांच्या मनातील अपरिपक्व कल्पना ! शाळेमध्ये दोन सत्र परीक्षा, चार चाचण्या होत असतील, भरपूर गृहपाठ दिले जात असतील तर मूल्यमापन चांगल्या रितीने चालले आहे असे मानले जाते. मूल्यमापनात सातत्य आहे असे वाटते, परंतू असे मानणे ही गोड गैरसमजूत असू शकते.शिकविणे आणि मूल्यमापन या क्रिया एकमेकांत विरघळून जातील,तेव्हाच मूल्यमापनात सातत्य आले असे म्हणता येईल. मुले शिक्षकाभोवती वावरत असतांना, शब्दातून, कृती करून, मनातील कल्पना साकारत असताना डोळसपणे लक्ष दिल्यास सातत्यपूर्ण मूल्यमापन होऊ शकते.या प्रकारे आपल्या मनातील विद्यार्थी शाळेमध्ये घडायला हवा हवा असेल तर मूल्यमापन सातत्यपूर्ण आणि सर्वकंष होणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय अभ्यासक्रम २००५ मध्ये स्मरणावर भर देणाऱ्या परीक्षेऐवजी नाविण्यपूर्ण मूल्यमापन प्रक्रियेचा अवलंब करण्यावर विशेष भर दिला आहे. त्यामध्ये तोंडी काम, गटकार्य,गटकार्यातून मूल्यमापन, छोटे छौटे प्रकल्प इत्यादी पर्याय सुचविले आहेत. बालकाच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनिनयम २००९ नूसार व महाराष्ट्र शासनाच्या धोरणानूसार २०१० -२०११ या शैक्षणिक वर्षात योजनेला प्रत्यक्ष सुरूवात झाली.

## संशोधन अभ्यासाची गरज :

प्रस्तुत मूल्यमापन योजना नवीन असल्याने उच्च प्राथमिक शिक्षकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे.आकारीक मूल्यमापनाच्या तंत्रातील दैनंदिन निरीक्षणाच्या नोंदी करतांना कोणकोणते घटक लक्षात घ्यावे ? उपक्रम निवडतांना कोणत्या उपक्रमांना प्राधान्य द्यावे? गटकार्याचा विषय कसा निवडावा? संकलित आणि अकारीक मूल्यमापनातील तोंडी परीक्षा त्याच प्रमाणे श्रेणी पध्दत या सर्व गोष्टी बद्दल शिक्षकांना अडचणी येऊ लागल्या व मुख्याध्यापकांना शिक्षकांना योग्य ते मार्गदर्शन करणे अवघड झाले.या अडचणींचे निराकरण करण्यासाठी,प्रस्तुत विषयाची शाळेतील सद्दस्थिती जाणून घेण्यासाठी संशोधकाला संशोधन करण्याची गरज वाटली.

## संशोधनाचे महत्व :

**१.**सदरहू संशोधनामुळे उच्च प्राथमिक (इयत्ता ५ वी ते ८वी) ला अध्यापन करणा-या शिक्षकांना सातत्यपूर्ण सर्वकंष मूल्यमापनात येणा-या समस्यांचे निराकरण करण्यासाठी उपयोग होणार आहे.

**२.**प्रस्तुत संशोधनाचा उपयोग उच्च प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक, योजनेची अंमलबजावणी सातत्यपूर्ण सर्वकंष मूल्यमापन योजनेची अंमलबजावणी करणा-या केंद्रप्रमुख यांना उपयुक्त ठरणार आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे :

**१.** सातत्यपूर्ण सर्वकंष मूल्यमापन योजनेचा अभ्यास करणे.

२. विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण सर्वकंष मूल्यमापन करतांना शिक्षकांना येणा-या समस्यांचा अभ्यास करणे.
३. सातत्यपूर्ण सर्वकंष मूल्यमापन योजना राबवितांना मुख्याध्यापकांना येणा-या समस्यांचा अभ्यास करणे.
४. सातत्यपूर्ण सर्वकंष मूल्यमापनाचे साधने व तंत्रे वापरतांना येणा-या समस्यांवर उपाययोजना सुचविणे.

**संशोधनाची व्याप्ती :**

**१.**प्रस्तुत संशोधनासाठी अकोले तालुक्यातील उच्च प्राथमिक शाळांमधील इयत्ता पाचवी ते आठवी वर्गाचाच विचार केलेला आहे.

**२.** सदरहू संशोधनासाठी इयत्ता पाचवी ते आठवी च्या वर्गशिक्षकांचाच विचार केलेला आहे.

**संशोधनाची मर्यादा :**

१. सदरहू संशोधनात अकोले तालुक्यातील उच्च प्राथमिक शाळांमधील इयत्ता पाचवी ते आठवी वर्गाव्यतिरिक्त इतर वर्गाचा विचार केलेला नाही.
२. प्रस्तुत संशोधनासाठी सातत्यपूर्ण सर्वकंष मूल्यमापनात इयत्ता पाचवी ते आठवी वर्गांना अध्यापन करणा-या शिक्षकांशिवाय इतर शिक्षकांचा विचार केलेला नाही.
३. प्रस्तुत संशोधनासाठी अकारीक व संकलित मूल्यमापना व्यतिरिक्त इतर घटकांचा विचार केलेला नाही.

**नमुना निवड :**

- प्रस्तुत संशोधनासाठी संभाव्यता नमुना निवड पध्दतीपैकी यादृच्छिक पध्दतीने नमुना निवड केलेली आहे.
- सोलापूर शहरातील २० शाळांची निवड यादृच्छिक पध्दतीने करण्यात आलेली आहे.
- वीस शाळांमधील इयत्ता ९ वीच्या वर्गातील १,४५६ विद्यार्थ्यांपैकी २५ टक्के म्हणजे ३६४ विद्यार्थ्यांची यादृच्छिक पध्दतीने निवड करण्यात आली.
- वीस शाळांमधील ५ वी ते ८वी च्या वर्गांना शिकविणा-या ८० शिक्षकांची निवड करण्यात आलेली आहे.

**संशोधनाची कार्यपध्दती :**

- **संशोधन पध्दतीची निवड :**

संशोधकाने निवडलेली समस्या सद्यस्थितीतील आहे.संशोधन समस्येचे स्वरुप, दृष्टिकोन व उद्दिष्टे विचारात घेऊन वर्णनात्मक संशोधन पध्दती मधील शालेय सर्वेक्षण पध्दतीची निवड केली आहे.

**संशोधन साधने व तंत्राची निवड :**

- शिक्षकांसाठी प्रश्नावली.
- मुख्याध्यापकांसाठी मुलाखत.

**संशोधनाचे निष्कर्ष :**

**१.**२०१० २०११ चे सातत्यपूर्ण सर्वकंष मुल्यमापनाचे प्रशिक्षण पूर्ण केलेले आहे असा प्रतिसाद देणा-या उच्च प्राथमिक शिक्षकांचे प्रमाण १०० टक्के आहे.

२.सातत्यपूर्ण सर्वकंष मुल्यमापन शिक्षकांच्या प्रशिक्षणानंतर शाळेत इतर शिक्षकांसाठी उद्‌बोधन वर्गाचे आयोजन करणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण १०० टक्के आहे.

३.सातत्यपूर्ण सर्वकंष मुल्यमापन विद्यार्थ्यांच्या कृतिशीलतेला जोड देणारी आहे असा प्रतिसाद देणा-या शिक्षकाचे प्रमाण १०० टक्के आहे.

४.अकारीक मूल्यमापनातील साधने विद्यार्थ्यांच्या सहकार्याने राबवावीत असा प्रतिसाद देणा-या शिक्षकांचे प्रमाण ९७ टक्के आहे.

५.प्रगती पुस्तकातील विशेष नोंदी लक्षात घेतांना शालेय विषयांचा प्रतिसाद,सहशालेय उपक्रमातील यश,वारंवार दिसणारा उल्लेखनिय प्रतिसाद या गोष्टींना प्राधान्य देण्यात यावे असा प्रतिसाद देणा-या शिक्षकाचे प्रमाण ९५ टक्के आहे.

६.संकलीत मूल्यमापनानंतर विद्यार्थ्यांना अतिरिक्त पूरक मार्गदर्शन करणे गरजेचे आहे असा प्रतिसाद देणा-या शिक्षकांचे प्रमाण ९५ टक्के आहे.
७.नोंदी वैशिष्टयेपूर्ण की सामान्य कराव्यात अशी समस्या येतात असा प्रतिसाद देणा-या शिक्षकाचे प्रमाण ८५ टक्के आहे.
८.वर्गकायासाठी सहाध्यायी मूल्यमापन आवश्यक आहे असा प्रतिसाद देणा-या शिक्षकाचे प्रमाण ९० टक्के आहे.
९.आकारीक मूल्यमापनाला संवेदनशिलतेची जोड देणे गरजेचे आहे असा प्रतिसाद देणा-या शिक्षकाचे प्रमाण ९० टक्के आहे.
१०.संकलीत मूल्यमापनासाठी साधने तयार करतांना यांत्रिक प्रतिसादाला वाव देणे टाळावे असा प्रतिसाद देणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण ८० टक्के आहे.
११.प्रकल्पाच्या कार्यवाहीसाठी वर्गशिक्षक व विषय शिक्षक यांच्या बरोबर चर्चा करावी असा प्रतिसाद देणा-या मुख्याध्याकांचे प्रमाण ८५ टक्के आहे.

## संदर्भ ग्रंथसूची

१.मुळे,रा.श., उमाठे वि.तु.(१९८७).शैक्षणिक संशोधन मुलतत्वे,नागपूर : विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ
२.भिंताडे,वि.रा. (२००९).शैक्षणिक संशोधन पध्दती,पुणे : नित्यनूतन प्रकाशन
३.संपादक,सातत्यपूर्ण सर्वकंष मूल्यमापन, शिक्षक मार्गदर्शिका भाग - १ व २
4. http://www.teachermagazine.org/ew.vol.7.38 peer 417
5. http://www.jcwmich.edu1999,august18